# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

## मा. ह प्रभाग समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - २

## (सभावृत्तांत)

दिनांक – ३/०५/२०१८ वेळ. दु.१२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दि. ३/०५/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयाचे "पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहामध्ये" आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य / नगरसदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य नांव | |
|---|---|---|
| 1 | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| 2 | मा.सुजाता सुनिल पालांडे | सदस्या |
| 3 | मा.बनसोडे राजू विश्वनाथ | सदस्य |
| 4 | मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत | सदस्या |
| 5 | मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे | सदस्य |
| 6 | मा.राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| 7 | मा.चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| 8 | मा.संतोष बबन कांबळे | सदस्य |
| 9 | मा.अनिकेत राजेंद्र काटे | स्विकृत सदस्य |
| 10 | मा.कुणाल दशरथ लांडगे | स्विकृत सदस्य |
| 11 | मा.संजय गुलाब कणसे | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.पवार आर.एस.(कार्यकारी अभियंता पा.पु), श्री.रामदास तांबे (कार्य.अभियंता पापु), श्री.शिरीष पोरेडी (उप.अभियंता स्था), श्री.विजयसिंह भोसले (उप.अभियंता स्था), श्री.दिलीप धुमाळ (उप.अभियंता वि), श्री.कोंडे ए. बी. (उप.अभियंता जनि), श्री.नरोटे एस. एल. (उप.अभियंता उद्यान स्था) डॉ. शंकर जाधव (उप अधिक्षक ycm), श्री.जे.व्ही.पटेल (उद्यान निरीक्षक), श्री.शिरसाठ आर.डी. (उद्यान सहाय्यक), श्री.प्रदीप बाराथे (लेखाधिकारी), श्री. लांडगे संतोष (उद्यान सहाय्यक), श्री. अरुण मारुती दगडे (पशुवैद्यकिय अधिकारी), श्री.मोरे ए.ए. (क.अ. स्था.उद्यान), श्री. निलेश दाने (क.अ.पापु), श्री. अमित दिक्षित (क.अ.पापु) श्री.अमर जाधव (क.अ.पापु), श्री. गायकवाड आर.बी. (mpw पशुवैद्यकिय विभाग) श्री. संदिप लोहकरे (क.अ.जनि.), श्री.रमेश जिंतीकर (क.अ.जनि), श्री.समीर दळवी (क.अ.वि), श्री.दांगडे सुनिल (क.अ.स्था), श्री.भंडारी एस.पी (क.अ.स्था), श्री.देवकर जे.डी.(क.अ.स्था), श्रीम.जयश्री साळवे (क्रीडा पर्यवेक्षक), श्री.सुनील चौहान (आ.नि),

श्री.संजय मानमोडे (आ.नि), श्रीम.रश्मी तुंडलवार (आ.नि), श्री.उध्दव डवरी (आ.नि), श्री.सचिन सानप (क.अ.स्था) इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती – उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) दि. १/०३/२०१८ रोजी झालेल्या मासिक सभेचा (कार्यपत्रिका क्र.९) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

ब) दि. २६/०४/२०१८ रोजी झालेल्या स्विकृत सदस्य निवड सभेचा (कार्यपत्रिका क्र. १०) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दि.२७/०४/२०१८ रोजी झालेल्या सभापती निवड (कार्यपत्रिका क्र.१) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

<u>उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले –</u>

विषय क्र.४) प्रभाग क्र. २० गोलमंडईला "श्री.श्री.श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज गोलमंडई" असे नांव देणेस व APJ अब्दुल कलाम उद्यान समोरील रोडला "मैत्री चौक" असे नांव देणेबाबत - मा.सुजाता पालांडे व मा.स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) प्रभाग क्र.३० महावीर चौक दापोडी ११ नं. बस स्टॉप येथे "श्री.स्वामी समर्थ प्रवेशद्वार" या नावाचे आर.सी.सी. कमान करणेबाबत मा. रोहित काटे व राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६) प्रभाग क्र.३० कासारवाडी स्मशानभूमी प्रवेशद्वारास "कै. ज्ञानोबा उर्फ तात्या जवळकर" असे नांव देणेबाबत - मा. रोहित काटे व राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

ठराव क्र - २
दि - ३/५/२०१८ विषय क्र - १
विभाग – स्थापत्य
सुचक - मा.स्वाती (माई) काटे अनुमोदक – मा.राजू बनसोडे
संदर्भ - मा. स्वाती (माई) काटे यांचा दि. ९ / ३ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी हे तीन गाव मुख्य रस्त्यालगत मुंबई-पुणे हायवे आहे परंतु या ठिकाणी एकही महिला स्वच्छतागृह नाही. तरी सदर ठिकाणी लवकरात लवकर **महिला स्वच्छतागृह बांधणेस** मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्र - ३ | विषय क्र - २
दि - ३/५/२०१८ | विभाग – स्थापत्य
सुचक - मा.स्वाती (माई) काटे | अनुमोदक – मा.राजू बनसोडे

संदर्भ - मा. स्वाती (माई) काटे यांचा दि. ५ /३/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडी गुलाबनगर येथे मोठी लोकसंख्या असलेली वस्ती आहे. तसेच वैयत्तीक भरपुर घरांमध्ये (संडास) टॉयलेट आहेत. त्या ठिकाणची मोठी लोकसंख्या व भरपुर प्रमाणात तरुण युवक, लहान मुले-मुली व महिला व ज्येष्ठ नागरिक आहेत. तरी त्या ठिकाणी एकही सांस्कृतिक भवन व व्यायामशाळा नाही.

तरी दापोडी, गुलाबनगर येथे जुने बंद (संडास) टॉयलेट च्या जागेवर नवीन **सांस्कृतिक भवन व व्यायामशाळा ( डबलमजली ) बांधणेस** मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - ४ | विषय क्र - ३
दि - ३/५/२०१८ | विभाग – स्थापत्य
सुचक - मा.सुजाता पालांडे | अनुमोदक – मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील जा.क्र. हक्षेका /१०/ कावि /४५ /२०१८,
दि. २१/४/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. २० मधील पूर्वीच्या फिलिप्स कंपनीच्या चौकात कॉ. चटर्जी यांचा पुतळा उभारलेला आहे. त्या चौकाला **"कामगार नेते शहीद कॉ. दादा रुपमय चटर्जी चौक"** असे नाव देणेस तसेच शहीद कॉ. दादा रुपमय चटर्जी यांच्या पुतळयापासून कामत कॉम्प्लेक्स या रस्त्याला **"देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस"** असे नाव देणेस व शहीद कॉ.दादा रुपमय चटर्जी यांचा पेप्को फौंड्री कंपनीजवळ अपघात झाला त्या ठिकाणी **चौथरा उभारुन सुशोभिकरण** करणेस, शहीद कॉ. दादा रुपमय चटर्जी पुतळयाजवळ **कायमस्वरुपी पाणी आणि लाईटची सोय** करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>

ठराव क्र - ५ | विषय क्र - ४
दि - ३/५/२०१८ | विभाग – स्थापत्य
सुचक - मा.सुजाता पालांडे | अनुमोदक – मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा.सुजाता पालांडे व मा.स्वाती (माई) काटे यांचा दि. ३/५/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० येथील गोलमंडईला **"श्री.श्री.श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज गोलमंडई"** असे नाव देणेस व APJ अब्दुल कलाम उद्यान समोरील रोडला **"मैत्री चौक"** असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - ६ विषय क्र - ५

दि - ३/५/२०१८ विभाग – स्थापत्य

सुचक - मा.रोहित काटे अनुमोदक – मा. राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा दि. ३/५/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० महावीर चौक दापोडी ११ नं. बस स्टॉप येथे "श्री.स्वामी समर्थ प्रवेशद्वार" या नावाची आर.सी.सी. कमान करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र – ७ विषय क्र - ६

दि - ३/५/२०१८ विभाग – स्थापत्य

सुचक - मा.रोहित काटे अनुमोदक – मा. राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा दि. ३/५/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० "कासारवाडी स्मशानभूमी प्रवेशद्वारास "कै. ज्ञानोबा उर्फ तात्या जवळकर" असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

(मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत )
सभापती, ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षे / १० / कावि / ८५ / २०१८
दिनांक २१ / ०५ / २०१८

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर